जाहिरात नमुना

वृत्तपत्रात प्रसिद्धी करिता आकारमान ( १२ सेमी X १० सेमी )

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुलाखत २०२१ तयारी करीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य लाभ देणे योजना साठी अर्ज मागविणेबाबत

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हि एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. सदर संस्थेमार्फत अनुसूचित जमातीतील युवक व युवतीसाठी सेवा पूर्व प्रशिक्षण धोरणांतर्गत संघ व राज्य लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा कार्यक्रम राबविले जातात. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र . प्रशिक्षण -२०२० / प्र.क्र. ७५ / का. -०९ दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० अन्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील उमेदवारांसाठी सघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य व मुलाखत तयारी करिता आर्थिक सहाय्य देणे बाबत निर्णय घेण्यात आला आहे.

संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२१ उत्तीर्ण असलेले अनुसूचित जमातीतील पात्र उमेदवारांना नागरी सेवा मुलाखत २०२१ तयारी करीता त्यांचा आवश्यक शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी अर्थ सहाय्य मिळणेबाबत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जाचा नमुना तसेच या बाबतचा सविस्तर तपशील, अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्र, ई समन्स किंवा संघ लोकसेवा नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२१ उत्तीर्ण झालेबाबतचे कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ **https://trti.maharashtra.gov.in/index.php/en/** ला भेट द्यावी.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांची अर्हतेनुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : २५.०४.२०२२

वार : सोमवार वेळ : ५ वाजता

स्थळ: आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे

(डॉ . राजेंद्र भारुड भा.प्र. से.)

आयुक्त